नि.फौ.ख.क्रं. २४५/२०२४
शासन वि. बाळासाहेब
नि.क्र. ४९/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०४ यांची शपथेवर जबानी**

नाव : विलास सोनाजी मदने

वय : २५ वर्षे

व्यवसाय : शेती

राहणार : शिराळ, ता. आष्टी जि. बीड

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

०१. फिर्यादी माझी वहिणी आहे. फिर्यादीचे पती राजेंद्र मदने व आरोपी क्र. १ बाळासाहेब मदने चुलत भाऊ आहेत. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ बाळासाहेब मदने साक्षीदार क्र. २ राजेंद्रला जुन्या वादातुन शिवीगाळ करत होते. त्यावेळी फिर्यादी, सा.क्र. २ व आरोपी क्र. १ ते ६ हजर होते. सर्व आरोपी नातेवाईक असल्याने ओळखतो. आज न्यायालयात आरोपी क्र. १ ते ३ व ६ हजर आहे. घटना मदने वस्तीवर घडली. सा.क्र. २ राजेंद्र आरोपी क्र. १ ला शिवीगाळ करु नको असे म्हणाला असता, त्यामुळे आरोपी क्र. २ रुपाली ला राग आला. त्यामुळे आरोपी क्र. १ ने सा.क्र. २ राजेंद्रला व फिर्यादी वंदनास डोक्यात दगड मारला. तेथे आरडाओरडा झाला. तेथे मी व सा.क्र. ३ शांतीलाल आलो व भांडणे सोडवली. आरोपी क्र. ३ तुषार याने सा.क्र. २ राजेंद्रला लोखंडी फावड्याने डोक्यात मारले. आरोपी क्र. ४ ते ६ यांनी सा.क्र. २ राजेंद्रला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. घटनेबाबत पोलीसांनी चौकशी करुन माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदवला.

०२. आरोपींनी ज्या दगडाने व लोखंडी फावड्याने मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३३/२०२५ वरील मुद्येमाल दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास व लोखंडी फावड्यास अनुक्रमे **एम.ओ. १ व २** देण्यात आला आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांच्यातर्फे उलटतपास - सुरु.**

०३. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझी जन्म तारीख ०४/१०/१९९९ आहे.

मी व भाऊ सा.क्र. ३ शांतीलाल एकत्र राहतो. भाऊ शांतीलालचे लग्न झालेले आहे. मी अविवाहीत आहे. आमच्या घरात एकुण ५ लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ रुपाली हिने दाखल केलेल्या केसमध्ये मी आरोपी आहे. आरोपी व आमच्यामध्ये जुने कोणत्या कारणावरुन वाद आहे हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आवाज आल्यानंतर मी गेलो त्यापुर्वी घटना घडुन गेली होती. भाऊ शांतीलाल मदने याचा विवाह १८/१२/२०१८ रोजी झाला. मदने वस्ती ते शिराळ २ कि.मी. अंतर आहे. मदनेवस्तीवर २० लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमची शेती एकाच गटामध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला रुपालीने आरोपी केल्यामुळे तसेच फिर्यादी वंदना व सा.क्र. २ राजेंद्रला मदत व्हावी म्हणुन मी साक्षकामी आलो आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी वंदना व सा.क्र. २ राजेंद्र याने आरोपी क्र. २ रुपाली हिला मारहाण केली त्यावेळी मी भांडणे सोडविण्यासाठी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी वंदना हिने दिलेली फिर्याद मी पाहिली नाही व वाचली नाही. फिर्यादीने घटनेबाबत कोणती वेळ सांगितली हे माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज प्रथमतः माझा नोंदवलेला जबाब पाहिला यापुर्वी जबाब पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस मला प्रत्यक्ष भेटले नाही व माझा जबाब नोंदवला नाही. चंदुबाई ही माझी चुलती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्ष ऐकीव माहितीवरुन देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र मदने च्या उत्तरेस सोनाजीचे घर आहे. माझे घर आरोपी क्र. २ रुपाली व सा.क्र. २ राजेंद्र यांच्या घराच्या पश्चिमेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांची घरे एकमेकांच्या शेजारी असुन बाहेर आल्यानंतर ते एकमेकांना दिसतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ रुपाली हिने दि. ०३/१२/२०२३ रोजी केलेल्या केसला शह देण्यासाठी फिर्यादीने व सा.क्र. २ यांनी सदरची केस केली. अमान्य की, फिर्यादीचे कुटुंब आरोपीच्या मानाने सदन आहे. सा.क्र. २ कडे स्वतःचे दोनचाकी व चारचाकी वाहन आहे. आरोपी क्र. ४ आप्पाच्या जमीनीतुन पाट गेलेबाबत तसेच त्याची केस औरंगाबाद येथे चालु असलेबाबत सांगता येत नाही. राजेंद्रच्या घराच्या दोन्ही बाजुने गोठा आहे. गोठ्याच्या आजुबाजुला फावडे, घमेले पडलेले असते. राजेंद्रच्या घराच्या दारामध्ये दगड,माती, शेण पडलेले असते. पाटाचे पैसे आरोपी क्र. ४ आप्पा यांना मिळणार असलेबाबत सांगता येत नाही.

०५.	आरोपींनी फिर्यादीच्या विरुध्द ३ अदखलपात्र गुन्हे दाखल केलेबाबत सांगता येत नाही. ७–८ वर्षापुर्वी आरोपींना फिर्यादीच्या कुटुंबीयांनी मारहाण केलेबाबत खटला दाखल असलेबाबत माहिती नाही. अमान्य की, फिर्यादी व सा.क्र. २ राजेंद्र रागीट स्वभावाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मित्र असल्यामुळे फिर्यादीकडे पोलीसांचे येणेजाणे असते. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द केस केल्याबाबत सांगता येत नाही. आरोपी क्र. ४ आप्पा यांचे आरोपी, फिर्यादी व इतर लोकांच्या घरी उठणे–बसणे असलेबाबत सांगता येत नाही. आरोपी क्र. ४ व ५ वयस्कर आहेत. आरोपी क्र. १ ते ६ नातेवाईक असल्याने ओळखतो. अमान्य की, फिर्यादी कुटुंबीयांशी लोभाचे/प्रेमाचे संबंध आहेत. अमान्य की, सरतपासातील नमुद मजकुर खोटा सांगितला आहे. अमान्य की, आरोपींनी मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, फावड्याने व दगडाने मारहाण केलेबाबत खोटे सांगत आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.०५.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.06 11:15:35 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी